RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक १०८ (४)] शुक्रवार, ऑगस्ट २१, २०२६/ श्रावण ३०, शके १९४८ [पृष्ठे १९, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ३६५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, ९ वा मजला,नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग,
मुंबई ४०० ००१, दिनांक २० ऑगस्ट २०२६.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक सेप्रनि/२०१६/प्र.क.४४४/वैसेवा-३.— भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून आणि या संदर्भात करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख अधिक्रमित करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाच्या नियंत्रणाखालील वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयांतर्गत येणाऱ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्नित रुग्णालयांतील “सांख्यिकी-नि-अधिव्याख्याता, गट-ब (राजपत्रित)” या पदाच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करण्यासाठी याद्वारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना “वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयांतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्नित रुग्णालयांतील सांख्यिकी-नि-अधिव्याख्याता, गट-ब (राजपत्रित) (सेवाप्रवेश) नियम, २०२६” असे संबोधण्यात यावे.

२. या नियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(क) “नियुक्ती प्राधिकारी” याचा अर्थ शासकीय सेवेतील वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयांतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्नित रुग्णालयांतील सांख्यिकी-नि-अधिव्याख्याता, गट-ब (राजपत्रित) या पदांवर उमेदवारांची नियुक्ती करण्यासाठी सक्षम असणारा मंत्री (वैद्यकीय शिक्षण) असा आहे;

(ख) “आयोग” याचा अर्थ महाराष्ट्र लोकसेवा आयोग असा आहे;

(ग) “संचालनालय” याचा अर्थ शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत येणारे वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय असा आहे;

(घ) “शासन” याचा अर्थ महाराष्ट्र शासन असा आहे;

(ङ) “पदव्युत्तर अर्हता” याचा अर्थ एम.एस्सी. (सांख्यिकीशास्त्र) ही सांविधिक विद्यापीठाची पदवी असा आहे;

(च) “मान्यता प्राप्त वैद्यकीय महाविद्यालय” याचा अर्थ राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाची मान्यता प्राप्त असलेले वैद्यकीय महाविद्यालय असा आहे.

३. शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्नित रुग्णालयांतील सांख्यिकी-नि-अधिव्याख्याता, गट-ब (राजपत्रित) या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईलः- आयोगाकडून घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांमधून, पुढील निकषांची पूर्तता करणाऱ्या व्यक्तीची नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यात येईल, ती अशी—

i. वयोमर्यादा :—

(अ) किमान वयोमर्यादा - सदर पदाच्या भरतीसाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वयाची अठरा वर्षे पूर्ण केलेली असावीत.

(ब) कमाल वयोमर्यादा - सदर पदाच्या भरतीसाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास अराखीव प्रवर्गातील व्यक्तींसाठी वय अडतीस वर्षांपेक्षा अधिक व राखीव प्रवर्गातील व्यक्तींसाठी वय त्रेचाळीस वर्षांपेक्षा अधिक नसावे.

ii. किमान शैक्षणिक अर्हता :—

पदव्युत्तर अर्हता धारण केलेली असणे आवश्यक राहील.

iii. अनुभव :—

निवासी किंवा निबंधक किंवा निर्देशक किंवा पाठ्यनिर्देशक म्हणून मान्यता प्राप्त वैद्यकीय महाविद्यालयात सांख्यिकीशास्त्र या विषयाच्या अध्यापनाचा ३ वर्षांचा अनुभव धारण करणे आवश्यक राहील.

परंतु, किमान शैक्षणिक अर्हता धारण केल्याच्या दिनांकानंतरचा अनुभव कालावधी विचारात घेण्यात येईल.

४. नियम ३ येथे नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाने नियुक्ती देण्याचे प्रमाण १०० टक्के राहील.

५. शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्नित रुग्णालयांतील सांख्यिकी-नि-अधिव्याख्याता, गट-ब (राजपत्रित) या पदावरील नियुक्तीसाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने शैक्षणिक अर्हता व अनुभव याबाबत वेळोवेळी केलेल्या सुधारणा तंतोतंत लागू राहतील.

६. नियम ३ येथे नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त झालेली व्यक्ती दोन वर्षांच्या कालावधीकरिता परिवीक्षाधीन राहील. परिवीक्षा कालावधी हा नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या अधिकाराने कमाल एक वर्षांपर्यंत वाढविता येईल. सदर पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने परिवीक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. सदर व्यक्तीने परिवीक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास किंवा तो सदर पदासाठी अयोग्य असल्याचे दिसून आल्यास त्याची सेवा समाप्त करण्यास तो पात्र ठरेल.

७. नियम ३ येथे नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, मराठी भाषा परीक्षा व हिंदी भाषा परीक्षा या दोन्ही परीक्षांसंदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, मराठी भाषा व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण केलेली नसेल अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविलेली नसेल तर, नियुक्तीनंतर संबंधित नियमात नमूद केलेल्या विहित मुदतीत मराठी भाषा व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे विहीत मुदतीत मराठी भाषा व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास सदर परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत वार्षिक वेतनवाढ व वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय रहाणार नाही.

८. नियम ३ येथील पदावर नामनिर्देशनाने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, संगणक अर्हता प्रमाणपत्रासंदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, नियुक्तीपूर्वी संगणक अर्हता प्रमाणपत्र धारण केलेले नसल्यास, याबाबतच्या नियमात नमूद केलेल्या विहित मुदतीत सदर प्रमाणपत्र धारण करणे अथवा सदर प्रमाणपत्र प्राप्त करण्यापासून सूट मिळवलेली असणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे विहीत मुदतीत प्रमाणपत्र धारण न केल्यास अथवा सूट मिळवलेली नसल्यास सदर संगणक प्रमाणपत्र धारण करेपर्यंत अथवा सूट मिळेपर्यंत वार्षिक वेतनवाढ व वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय रहाणार नाही.

९. (१) नियम ३ येथील पदांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबांचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील तरतूदीनुसार व त्याबाबत वेळोवेळी करण्यात येणाऱ्या नियमांनुसार, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक राहील.

(२) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करण्याच्या दिनांकास दोनपेक्षा अधिक अपत्ये असलेली व्यक्ती शासकीय नियुक्तीसाठी अपात्र राहील.

(३) नियुक्तीच्या वेळी किंवा त्यानंतर त्यास दोनपेक्षा अधिक अपत्ये असल्याचे निदर्शनास आल्यास सदर व्यक्ती शासन सेवा सुरू ठेवण्यास अपात्र होईल.

१०. नियम ३ येथील पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तींची सेवाज्येष्ठता यादी ही राज्यस्तरावर ठेवण्यात येईल. त्यामुळे सदर व्यक्ती ही महाराष्ट्रात कोठेही बदलीस पात्र राहील.

११. सदर नियमानुसार शासकीय सेवेतील नियुक्तीनंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियम, आदेश व शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या अटी व शर्ती संबंधित शासकीय कर्मचाऱ्यास लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्वेतांबरी खडे,**
शासनाच्या उप सचिव.

## MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT

Gokuldas Tejpal Hospital Compound, 9th Floor, L.T. Marg, New Mantralaya,
Mumbai 400 001, dated the 20th August 2026.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. SEPRANI 3016/C.R.444/VAISEVA-3.— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all existing rules, order or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the post of *Statistician-Cum-Lecturer*, Group B (Gazetted) in the Government Medical Colleges and Hospitals in the Directorate of Medical Education and Research under the Medical Education and Drugs Department of the Government of Maharashtra :—

1. These rules may be called the *Statistician-Cum-Lecturer*, Group B (Gazetted) in the Government Medical Colleges and Hospitals, under the Directorate of Medical Education and Research under the Medical Education and Drugs Department (Recruitment) Rules, 2026.

2. In these rules unless the context requires otherwise,—

(*a*) "Appointing Authority" means the Minister, Medical Education having competence to make appointment to the post of the *Statistician-Cum-Lecturer* in Government Service in the Government Medical Colleges and Hospitals, under the Directorate of Medical Education and Research;

(*b*) "Commission" means the Maharashtra Public Service Commission;

(*c*) "Directorate" means the Directorate of Medical Education and Research, under the administrative control of the Medical Education and Drugs Department of the Government;

(*d*) "Government" means the Government of Maharashtra;

(*e*) "Postgraduate Qualification" means M.Sc. (Statistics) degree of a statutory University;

(*f*) "recognized Medical College" means the Medical College recognized by the National Medical Commission.

3. Appointment to the post of *Statistician-Cum-Lecturer*, Group B (Gazetted) in Government Medical Colleges and Hospitals shall be made :- by nomination from among the candidates recommended by the Commission on the basis of result of Competitive Examination conducted therefor; who fulfills the following criteria, namely :—

(*i*) Age Limit :—

(*a*) Lower Age Limit.— Not less than eighteen years of age as on the last date of receipt of application as per the advertisement for the recruitment to the post.

(*b*) Upper Age Limit.— Not more than thirty-eight years of age for the persons not belonging to reserved categories and forty-three years of age for the persons belonging to reserved categories as on the last date of receipt of application as per the advertisement for recruitment to the post.

(*ii*) Minimum Educational Qualification :-

It is necessary to possess postgraduate qualification.

(*iii*) Experience :—

Three years experience of teaching the Statistics subject in a recognized medical college as Resident or Registrar or Demonstrator or Tutor: Provided that, experience period will be calculated after holding minimum education qualification.

4. Appointment to the post mentioned in rule 3, shall be made by nomination in ratio 100 per cent.

5. The amendments made by the National Medical Commission regarding educational qualification and experience shall be precisely applicable for appointment to the post of *Statistician-Cum-Lecturer*, Group B (Gazzeted).

6. A person appointed to the post mentioned in rule 3 by nomination shall be on probation for a period of two years. The probation period may be extended maximum upto one year at the discretion of the Appointing Authority. A person appointed to the post shall be required to complete the probation period satisfactorily. If he does not complete probation period satisfactorily or is not found suitable for the post, then he shall be liable to be terminated from service.

7. A person appointed to the post mentioned in rule 3 by nomination, shall pass the Marathi and Hindi languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, unless he has already passed the said examination within the prescribed time limit after appointment or has been exempted from passing these examinations, otherwise he shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post till he passes those examinations.

8. A person appointed to the post mentioned in rule 3, by nomination, shall possess a certificate of Computer Operations prescribed by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment unless he has been exempted from possessing such certificated, otherwise he shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post till he possess such certificate.

9. (1) A person appointed to the post mentioned in rule 3, by nomination, shall submit a Declaration of Small Family as per the provisions of the Maharashtra Civil Services (Declaration of Small Family) Rules, 2005 or any other rules, orders or any instruments issued in this behalf, by the Government, from time to time.

(2) A person having more than two children on the date of submission of Declaration of Small Family, shall be disqualified for the appointment in Government Service.

(3) After appointment of a person in the Government Service, if it is proved that he has more than two children, at the time of appointment or thereafter then he shall be disqualified for the continuing on the said post in the Government Service.

10. The seniority list of the persons appointed on the post mentioned in rule 3, shall be maintained at State level. Therefore, such person shall be eligible to be transfer anywhere in The State of Maharashtra.

11. The terms and conditions specified by the Government subsequent to appointment of any Government Service, in any rules, order or resolutions issued by the Government, from time to time shall also be applicable to the Government servant.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHWETAMBARI KHADE,
Deputy Secretary to Government .

## वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, ९ वा मजला,नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग,
मुंबई ४०० ००१, दिनांक २० ऑगस्ट २०२६.

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक सेप्रनि-३०१७/प्र.क.३११/वैसेवा-३.— भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून आणि या संदर्भात निर्गमित करण्यात आलेले विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख अधिक्रमित करुन, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेल्या वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयांतर्गत येणाऱ्या शासकीय व्यवसायोपचार संस्थांतील प्राध्यापक, गट-अ (राजपत्रित), सहयोगी प्राध्यापक, गट-अ (राजपत्रित) व सहायक प्राध्यापक, गट-ब (राजपत्रित) या पदाच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करण्यासाठी याद्वारे पुढील नवीन नियम करीत आहेत. :—

**१.** या नियमांना "वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयांतर्गत शासकीय व्यवसायोपचार संस्थांतील प्राध्यापक, गट-अ (राजपत्रित), सहयोगी प्राध्यापक, गट-अ (राजपत्रित) व सहायक प्राध्यापक, गट-ब (राजपत्रित) (सेवाप्रवेश) नियम, २०२६" असे संबोधण्यात यावे.

**२.** या नियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(क) "नियुक्ती प्राधिकारी" याचा अर्थ,—

(१) प्राध्यापक, गट-अ व सहयोगी प्राध्यापक, गट-अ या पदांवर उमेदवारांची नियुक्ती करण्यासाठी सक्षम असणारे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री असा आहे ;

(२) सहायक प्राध्यापक, गट-ब या पदावर उमेदवाराची नियुक्ती करण्यासाठी सक्षम असणारे संबंधित विभागाचे मंत्री असा आहे;

(ख) "आयोग" याचा अर्थ महाराष्ट्र लोकसेवा आयोग असा आहे;

(ग) "संचालनालय" याचा अर्थ शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत येणारे

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय असा आहे;

(घ) "शासन" याचा अर्थ महाराष्ट्र शासन असा आहे;

(ङ) "पदोन्नतीसाठीची पात्रता" याचा अर्थ, सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी नियम, शासन

निर्णय किंवा आदेशाद्वारे पदोन्नतीसाठी निर्धारित केलेल्या अटी व शर्तींनुसार असलेली

पदोन्नतीची पात्रता होय.

(च) "पदव्युत्तर पदवी" याचा अर्थ व्यवसायोपचारशास्त्रातील सांविधिक विद्यापीठाची पदव्युत्तर

पदवी असा आहे;

(छ) "मान्यताप्राप्त संस्था" याचा अर्थ महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांची मान्यताप्राप्त

असलेली व्यवसायोपचार शैक्षणिक संस्था असा आहे.

**३.** प्राध्यापक (गट-अ) या पदावर नियुक्ती पदोन्नतीने करण्यात येईल. ही नियुक्ती वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व्यवसायोपचार संस्थांमधील सहयोगी प्राध्यापक (गट-अ) पद धारण करणाऱ्या व पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेच्या आधारे, तसेच सदर पदावर चार वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित व अखंड सेवा पूर्ण केलेल्या योग्य व्यक्तीची करण्यात येईल :

परंतु असे की, आवश्यक अनुभव असलेली सहयोगी प्राध्यापक (गट-अ) पद धारण करणारी व्यक्ती उपलब्ध नसल्यास, प्राध्यापक (गट-अ) या पदावर नियुक्ती पदोन्नतीने अशा व्यक्तीची करण्यात येईल की, जी वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व्यवसायोपचार संस्थांमध्ये सहयोगी प्राध्यापक (गट-अ) हे पद धारण करीत असेल आणि जिने त्या संस्थांमध्ये सहयोगी प्राध्यापक व सहायक प्राध्यापक या पदांवरील एकत्रित सेवेसह किमान नऊ वर्षांची नियमित व अखंड सेवा पूर्ण केलेली असेल.

४. सहयोगी प्राध्यापक (गट-अ) या पदावर नियुक्ती पुढीलपैकी कोणत्याही एका पद्धतीने करण्यात येईल :—

(अ) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व्यवसायोपचार संस्थांमधील सहायक प्राध्यापक (गट-ब) हे पद धारण करणाऱ्या व पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेच्या आधारे, सदर पदावर किमान पाच वर्षांची नियमित व अखंड सेवा पूर्ण केलेल्या योग्य व्यक्तीची पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल;

किंवा

(ब) आयोगाने स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस केलेल्या उमेदवारांमधून, नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने, खालीलप्रमाणे निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांची नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्यात येईल, जसे की :-

**(i) वयोमर्यादा :—**

**(अ) किमान वयोमर्यादा :** सदर पदाच्या भरतीसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास अठरा वर्षे पूर्ण केलेली असावीत.

**(ब) कमाल वयोमर्यादा :** सदर पदाच्या भरतीसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास अराखीव प्रवर्गातील व्यक्तींसाठी वय चाळीस वर्षे व राखीव प्रवर्गातील व्यक्तींसाठी वय पंचेचाळीस वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

परंतु असे की, जे उमेदवार आधीपासून शासकीय सेवेत कार्यरत आहेत, अशा उमेदवारांसाठी वयोमर्यादेत पुढील पाच वर्षांची शिथिलता देण्यात येईल :

पुढे असेही की, जे मागासवर्गीय उमेदवार आधीपासून शासकीय सेवेत कार्यरत आहेत, त्यांना वयोमर्यादेतील शिथिलतेचा लाभ शासकीय सेवक म्हणून किंवा मागासवर्गीय उमेदवार म्हणून यापैकी कोणत्याही एका प्रकारे घेता येईल.

**(ii) किमान शैक्षणिक अर्हता :—**

उमेदवाराकडे व्यवसायोपचार विषयातील किमान पदव्युत्तर पदवी (Post Graduate Degree) असणे आवश्यक आहे.

**(iii) अनुभव :—**

उमेदवाराकडे मान्यताप्राप्त संस्थेमध्ये व्यवसायोपचार विषयातील सहाय्यक प्राध्यापक म्हणून किमान पाच वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.

नियम ४ (ब) (ii) मध्ये नमूद केलेली किमान शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा अनुभवच अनुभवाच्या कालावधीची गणना करताना विचारात घेतला जाईल.

५. सहायक प्राध्यापक (गट-ब) या पदावर नियुक्ती पुढीलपैकी कोणत्याही एका पद्धतीने करण्यात येईल :—

(अ) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व्यवसायोपचार संस्थांमधील व्यवसायोपचारतज्ञ (गट-क) हे पद धारण करणाऱ्या व पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेच्या आधारे, सदर पदावर किमान तीन वर्षांची नियमित व अखंड सेवा पूर्ण केलेल्या योग्य व्यक्तीची पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल; किंवा

(ब) आयोगाने घेतलेल्या स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांमधून, नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने, खालीलप्रमाणे निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांची नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्यात येईल, म्हणजे :—

**(i) वयोमर्यादा :-**

**(अ) किमान वयोमर्यादा :** सदर पदाच्या भरतीसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उमेदवाराने अठरा वर्षे पूर्ण केलेली असावीत.

**(ब) कमाल वयोमर्यादा :** सदर पदाच्या भरतीसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास, अराखीव प्रवर्गातील व्यक्तींसाठी अडतीस वर्षे व राखीव प्रवर्गातील व्यक्तींसाठी त्रेचाळीस वर्षे पूर्ण झालेली असावीत :

परंतु असे की, जे उमेदवार आधीपासून शासकीय सेवेत कार्यरत आहेत, अशा उमेदवारांसाठी वयोमर्यादेत पुढील पाच वर्षांची शिथिलता देण्यात येईल :

पुढे असेही की, जे मागासवर्गीय उमेदवार आधीपासून शासकीय सेवेत कार्यरत आहेत, त्यांना वयोमर्यादेतील शिथिलतेचा लाभ शासकीय सेवक म्हणून किंवा मागासवर्गीय उमेदवार म्हणून यापैकी कोणत्याही एका प्रकारे घेता येईल.

**(ii) किमान शैक्षणिक अर्हता :** उमेदवाराकडे व्यवसायोपचार विषयातील किमान पदव्युत्तर पदवी (Post Graduate Degree) असणे आवश्यक आहे.

**६.** नियम ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने व नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करताना, भरण्यात येणाऱ्या एकूण मंजूर पदांच्या संख्येसाठी अनुक्रमे ५० : ५० या प्रमाणात नियुक्ती करण्यात येईल :

परंतु असे की, पदोन्नतीने नियुक्तीसाठी योग्य व्यक्ती उपलब्ध नसल्यास, त्या विशिष्ट नियुक्ती वर्षासाठी पदोन्नती व नामनिर्देशन यांचे प्रमाण, नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने शिथिल करता येईल.

**७.** नियम ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती दोन वर्षांच्या कालावधीसाठी परिविक्षाधीन (Probation) राहील. परिविक्षाधीन कालावधी जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत वाढविता येईल. परिविक्षाधीन कालावधी (वाढीव कालावधीसह) शासनाच्या परिविक्षा धोरणानुसार समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. सदर धोरणानुसार परिविक्षाधीन कालावधी (वाढीव कालावधीसह) समाधानकारकरित्या पूर्ण करण्यात अपयश आल्यास, त्याची सेवा समाप्त करण्यास तो पात्र ठरेल.

**८.** (१) नियम ३, ४ किंवा ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने, शासनाने वेळोवेळी यासंबंधी केलेल्या नियमांनुसार मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील, जोपर्यंत त्याने त्या पदावर पदोन्नती मिळण्यापूर्वीच सदर परीक्षा उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा देण्यापासून त्याला सूट दिलेली नसेल.

(२) नियम ४ किंवा ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने, शासनाने वेळोवेळी यासंबंधी केलेल्या नियमांनुसार नियुक्तीनंतर निर्धारित कालावधीत मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील, जोपर्यंत त्याने त्या परीक्षा पूर्वीच उत्तीर्ण केलेल्या नसतील. सदर परीक्षा उत्तीर्ण करेपर्यंत त्या व्यक्तीस वार्षिक वेतनवाढ (Annual Increment) किंवा पुढील पदोन्नतीच्या पदासाठी पात्रता मिळणार नाही.

**९.** (१) नियम ३, ४ किंवा ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीकडे, शासनाने वेळोवेळी या संदर्भात निर्गमित केलेल्या नियम किंवा आदेशांनुसार संगणक अर्हता प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील, जोपर्यंत त्या व्यक्तीकडे सदर प्रमाणपत्र आधीपासून उपलब्ध नसेल किंवा त्या प्रमाणपत्रापासून त्याला पदोन्नतीपूर्वी सूट दिलेली नसेल,

(२) नियम ४ किंवा ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीकडे, शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या नियमांनुसार नियुक्तीनंतर निर्धारित कालावधीत संगणक अर्हता प्रमाणपत्र प्राप्त करणे अथवा सूट मिळालेली असणे आवश्यक राहील. अन्यथा, सदर प्रमाणपत्र प्राप्त करेपर्यंत ती व्यक्ती वार्षिक वेतनवाढ किंवा पुढील पदोन्नतीच्या पदासाठी पात्र असणार नाही.

**१०.** (१) नियम ४ किंवा ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ किंवा शासनाने वेळोवेळी या संदर्भात निर्गमित केलेले इतर नियम, आदेश किंवा संलेख यांच्या तरतुदीनुसार लहान कुटुंबाचे घोषणापत्र सादर करणे आवश्यक राहील.

(२) लहान कुटुंबाचे घोषणापत्र सादर करण्याच्या दिनांकास ज्या व्यक्तीस दोनपेक्षा अधिक अपत्ये असतील, ती व्यक्ती शासकीय सेवेत नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

(३) शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, नियुक्तीच्या वेळी किंवा त्यानंतर संबंधित व्यक्तीस दोनपेक्षा अधिक अपत्ये असल्याचे सिद्ध झाल्यास, ती व्यक्ती शासकीय सेवेत सदर पदावर कार्यरत राहण्यास अपात्र ठरेल.

**११.** नियम ३, ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हता व अनुभव, हे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने (Maharashtra University of Health Sciences) वेळोवेळी दिलेली मान्यता किंवा यथास्थिति, रद्द केलेली मान्यता याच्या अधीन राहतील.

**१२.** शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या कोणत्याही नियम किंवा शासन निर्णयांद्वारे निश्चित केलेल्या अटी व शर्ती, ज्या कोणत्याही शासकीय सेवकाच्या नियुक्तीपूर्वी किंवा नियुक्तीनंतर लागू करण्यात आलेल्या असतील, त्या नियम ३, ४ किंवा ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनाही लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्वेतांबरी खडे,**
शासनाच्या उप सचिव.

## MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT

Gokuldas Tejpal Hospital Compound, 9th Floor, L.T. Marg, New Mantralaya,
Mumbai 400001, dated the 20th August, 2026

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No.SEPRANI-3017/C.R.311/VAISEVA-3.— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all existing rules, orders or instruments issued in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the post of Professor, Group A (Gazetted), Associate Professor, Group A (Gazetted) and Assistant Professor, Group B (Gazetted) in the Government Occupational Therapy institutes on the establishment of Directorate of Medical Education and Research, under the administrative control of the Medical Education and Drugs Department of the Government of Maharashtra, namely :-

1. These rules may be called "the Professor (Group A) (Gazetted), Associate Professor (Group A) (Gazetted) and Assistant Professor (Group B) (Gazetted) in the Government Occupational Therapy institutes on the establishment of Directorate of Medical Education and Research under the administrative control of the Medical Education and Drugs Department (Recruitment) Rules, 2026.

2. In these rules unless the context requires otherwise,—

(*a*) "Appointing Authority" means,—

(i) the Chief Minister, State of Maharashtra in relation to the post of Group A ;

(ii) the Minister of the concerned Department in relation to the post of Group B ;

(*b*) "Commission" means the Maharashtra Public Service Commission ;

(*c*) "Directorate" means the Directorate of Medical Education and Research, under the administrative control of Medical Education and Drugs Department;

(*d*) "Government" means the Government of Maharashtra ;

(*e*) "eligibility for promotion" means eligibility for promotion in accordance with the terms and conditions specified for promotion by rules, Government Resolution or orders issued by the General Administration Department, from time to time ;

(*f*) "Postgraduate Degree" means the Postgraduate degree in Occupational Therapy of a statutory University ;

(*g*) "recognized institution" means the Occupational Therapy educational institute approved by the Maharashtra University of Health Sciences, Nasik.

3. Appointment to the post of Professor (Group A) shall be made by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority from amongst the persons holding the post of Associate Professor (Group A) in Government Occupational Therapy Institutes on the establishment of Directorate having a regular and continuous service in the said post for not less than four years :

Provided that, if a person holding the post of Associate Professor possessing requisite experience is not available, then appointment to the post of Professor ( Group A ) shall be made by promotion of a person holding the post of Associate Professor ( Group A ) in Government Occupational Therapy institutes, on the establishment of Directorate having not less than nine years of regular and continuous service, inclusive of combined service, as Associtate Professor and Assistant Professor in such institute.

4. Appointment to the post of Associate Professor (Group A) shall be made either,—

(*a*) by Promotion of a suitable person having eligibility for promotion, on the basis of seniority, from amongst the persons holding the post of Assistant Professor (Group B) in the

Government Occupational Therapy institutes on the establishment of Directorate having a regular and continuous service in the said post for not less than five years ; or

(*b*) by nomination from amongst the candidates recommended by the Commission on the basis of result of competitive examination, with the approval of the Appointing Authority, who fulfills the following criteria, namely :—

(*i*) Age Limit.—

(*a*) Lower Age Limit.— Eighteen years of age completed on the last date of receipt of applications as per the advertisement for recruitment to the said post.

(*b*) Upper Age Limit.— Forty years of age completed for the persons not belonging to reserved categories and forty five years of age for the persons belonging to reserved categories as on the last date of receipt of applications as per advertisement for recruitment to the said post:

Provided that, the age limit for candidates who are already in Government service shall be relaxed for further five years:

Provided further that, the backward class candidates who are already working in the Government service can avail relaxation of age limit either for the Government service employees or for backward class employees.

(*ii*) Minimum Educational Qualifications.- A person holding a minimum Post Graduate Degree in Occupational Therapy.

(*iii*) Experience.— A person holding a minimum experience of five years as Assistant Professor, Occupational Therapy in the recognized institution.

The experience after possessing the minimum educational qualification cited in rule 4 (b) (ii) shall be taken into consideration while counting the period of experience.

5. Appointment to the post of Assistant Professor (Group B) shall be made either,—

(a) by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority from amongst the persons holding the post of Occupational Therapist (Group C) in Government Occupational Therapy institutes on the establishment of Directorate having a regular and continuous service in the said post for not less than three years; or

(b) by nomination from amongst the candidates recommended by the Commission on the basis of the result of the competitive examination conducted by the Commission, with approval of the Appointing Authority, who fulfills the following criteria, namely:-

(i) Age Limit.-

(a) Lower Age Limit.- Eighteen years of age completed on the last date of receipt of applications as per the advertisement for recruitment to the said post.

(b) Upper Age Limit.- Thirty eight years of age completed for the persons not belonging to reserved categories and forty three years of age for the persons belonging to reserved categories as on the last date of receipt of applications as per advertisement for recruitment to the said post :

Provided that, the age limit for candidates who are already in Government service shall be relaxed for further five years :

Provided further that, the backward class candidianes who are already working in the Government service can avail relaxation of age limit either for the Government service employees or for backward class employees.

(ii) Minimum Educational Qualifications.— A person holding a minimum Post Graduate Degree in Occupational Therapy.

6. Appointment to the posts mentioned in rules 4 and 5 by promotion and nomination shall be made in the ratio of 50:50 respectively, for the total number of sanctioned posts to be filled :

Provided that, if a suitable person for appointment by promotion is not available, the ratio of appointment by promotion and by nomination may be relaxed for that particular appointment year with the approval of the Appointing Authority.

7. A person appointed to the post mentioned in rules 4 and 5 by nomination shall be on probation for a period of two years. The probation period may be extended maximum up to one year. The probation period (including extended period) shall be completed satisfactorily as per the probation policy of the Government. In the event of failing to complete the probation period (including extended period) satisfactorily, as per the said policy, his services shall be liable to be terminated.

8. (1) A person appointed to the post mentioned in the rule 3, 4 or 5 by promotion shall pass the Marathi and Hindi Languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, unless he has already passed or had been exempted from passing those examinations before getting promoted to the said post.

(2) A person appointed to the post mentioned in rule 4 or 5 by nomination shall pass the Marathi and Hindi Languages examinations as per the rules made in that behalf by the Government. from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has already passed the said examinations. He shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he passess those examinations.

9. (1) A person appointed to the post mentioned in rule 3, 4 or 5 by promotion shall possess certificate of Computer Operations prescribed by rules or orders issued in that behalf by the Government, from time to time, unless he already possesses such certificate or has been exempted there from, before getting promoted to the said post.

(2) A person appointed to the post mentioned in rule 4 or 5 by nomination shall possess a Certificate of Computer Operations prescribed by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has been exempted from possessing such Certificate, otherwise he shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he possesses such certificate.

10. (1) A person recommended for appointment by nomination to the post mentioned in rules 4 or 5 shall submit a declaration of Small Family as per the provision of the Maharashtra Civil Services (Small Family Declaration) Rules, 2005 or any other rules, orders or any instruments issued in this behalf by the Government, from time to time.

(2) A person having more than two children on the date of submission of Declaration of small family shall be disqualified for the appointment in Government Service.

(3) After appointment of a person in the Government service, if it is proved that he has more than two children at the time of appointment or thereafter, then he shall be disqualified for continuing on the said post in the Government service.

11. The educational qualification and experience mentioned in rules 3, 4 and 5 shall be subject to the recognition or de-recognition, as the case may be, of such educational qualification and experience as specified by the Maharashtra University of Health Sciences, from time to time.

12. The terms and conditions specified by the Government, in any rules or resolutions issued by the Government from time to time, before or subsequent to the appointment of any Government servant shall also be applicable to the person appointed on the post mentioned in rule 3, 4 or 5.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHWETAMBARI KHADE,
Deputy Secretary to Government.

# वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, ९ वा मजला,नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग,
मुंबई ४०० ००१, दिनांक २० ऑगस्ट २०२६.

## अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक सेप्रनि-२०१७/प्र.क.३११/वैसेवा-३.— भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून आणि या संदर्भात निर्गमित करण्यात आलेले विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख अधिक्रमित करुन, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेल्या वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयांतर्गत येणाऱ्या शासकीय भौतिकोपचार संस्थांतील प्राध्यापक, गट-अ (राजपत्रित), सहयोगी प्राध्यापक, गट-अ (राजपत्रित) व सहायक प्राध्यापक, गट-ब (राजपत्रित) या पदाच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करण्यासाठी याद्वारे पुढील नियम करीत आहेत,ः-

१. या नियमांना "वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयांतर्गत शासकीय भौतिकोपचार संस्थांतील प्राध्यापक, गट-अ (राजपत्रित), सहयोगी प्राध्यापक, गट-अ (राजपत्रित) व सहायक प्राध्यापक, गट-ब (राजपत्रित) (सेवाप्रवेश) नियम, २०२६" असे संबोधण्यात यावे.

२. या नियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(क) "नियुक्ती प्राधिकारी" याचा अर्थ ,-

(१) प्राध्यापक, गट-अ व सहयोगी प्राध्यापक, गट-अ या पदांवर उमेदवारांची नियुक्ती करण्यासाठी सक्षम असणारे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री असा आहे ;

(२) सहायक प्राध्यापक, गट-ब या पदावर उमेदवाराची नियुक्ती करण्यासाठी सक्षम असणारे संबंधित विभागाचे मंत्री असा आहे;

(ख) "आयोग" याचा अर्थ महाराष्ट्र लोकसेवा आयोग असा आहे;

(ग) "संचालनालय" याचा अर्थ शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत येणारे वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय असा आहे;

(घ) "शासन" याचा अर्थ महाराष्ट्र शासन असा आहे;

(ङ) "पदोन्नतीसाठीची पात्रता" याचा अर्थ, सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी नियम, शासन निर्णय किंवा आदेशाद्वारे पदोन्नतीसाठी निर्धारित केलेल्या अटी व शर्तींनुसार असलेली पदोन्नतीची पात्रता होय.

(च) "पदव्युत्तर पदवी" याचा अर्थ भौतिकोपचारशास्त्रातील सांविधिक विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी असा आहे;

(छ) "मान्यता प्राप्त संस्था" यांचा अर्थ महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांची मान्यता प्राप्त असलेली भौतिकोपचार शैक्षणिक संस्था असा आहे.

३. प्राध्यापक (गट-अ) या पदावर नियुक्ती पदोन्नतीने करण्यात येईल. ही नियुक्ती वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय भौतिकोपचार संस्थांमधील सहयोगी प्राध्यापक (गट-अ) पद धारण करणाऱ्या व पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेच्या आधारे, तसेच सदर पदावर चार वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित व अखंड सेवा पूर्ण केलेल्या योग्य व्यक्तीमधून करण्यात येईल ः

परंतु असे की, आवश्यक अनुभव असलेली सहयोगी प्राध्यापक (गट-अ) पद धारण करणारी व्यक्ती उपलब्ध नसल्यास, प्राध्यापक (गट-अ) या पदावर पदोन्नतीने अशा व्यक्तीची नियुक्ती करण्यात येईल की, जी वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय भौतिकोपचार संस्थांमध्ये सहयोगी प्राध्यापक (गट-अ) हे पद धारण करीत असेल

आणि जिने त्या संस्थांमध्ये सहयोगी प्राध्यापक व सहायक प्राध्यापक या पदांवरील एकत्रित सेवेसह किमान नऊ वर्षांची नियमित व अखंड सेवा पूर्ण केलेली असेल.

४. सहयोगी प्राध्यापक (गट-अ) या पदावर नियुक्ती पुढीलपैकी कोणत्याही एका पद्धतीने करण्यात येईल :—

(अ) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय भौतिकोपचार संस्थांमधील सहायक प्राध्यापक (गट-ब) हे पद धारण करणाऱ्या व पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेच्या आधारे, सदर पदावर किमान पाच वर्षांची नियमित व अखंड सेवा पूर्ण केलेल्या योग्य व्यक्तीची पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल; किंवा

(ब) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस केलेल्या उमेदवारांमधून, नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने, खालीलप्रमाणे निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांची नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्यात येईल, जसे की :-

**(i) वयोमर्यादा :—**

(अ) किमान वयोमर्यादा : सदर पदाच्या भरतीसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उमेदवाराने अठरा वर्षे पूर्ण केलेली असावीत.

(ब) कमाल वयोमर्यादा : सदर पदाच्या भरतीसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास, अराखीव प्रवर्गातील व्यक्तींसाठी वय चाळीस वर्षे व राखीव प्रवर्गातील व्यक्तींसाठी वय पंचेचाळीस वर्षांपेक्षा अधिक नसावे :

परंतु असे की, जे उमेदवार आधीपासून शासकीय सेवेत कार्यरत आहेत, अशा उमेदवारांसाठी वयोमर्यादेत पुढील पाच वर्षांची शिथिलता देण्यात येईल :

पुढे असेही की, जे मागासवर्गीय उमेदवार आधीपासून शासकीय सेवेत कार्यरत आहेत, त्यांना वयोमर्यादेतील शिथिलतेचा लाभ शासकीय सेवक म्हणून किंवा मागासवर्गीय उमेदवार म्हणून यापैकी कोणत्याही एका प्रकारे घेता येईल.

**(ii) किमान शैक्षणिक अर्हता :-**

उमेदवाराकडे भौतिकोपचार विषयातील किमान पदव्युत्तर पदवी (Post Graduate Degree) असणे आवश्यक आहे.

**(iii) अनुभव :-**

उमेदवाराकडे मान्यताप्राप्त संस्थेमध्ये भौतिकोपचार विषयातील सहायक प्राध्यापक म्हणून किमान पाच वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.

नियम ४ (ब) (ii) मध्ये नमूद केलेली किमान शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा अनुभवच अनुभवाच्या कालावधीची गणना करताना विचारात घेतला जाईल.

५. सहायक प्राध्यापक (गट-ब) या पदावर नियुक्ती पुढीलपैकी कोणत्याही एका पद्धतीने करण्यात येईल :—

(अ) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय भौतिकोपचार संस्थांमधील भौतिकोपचारतज्ञ (गट-क) हे पद धारण करणाऱ्या व पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेच्या आधारे, सदर पदावर किमान तीन वर्षांची नियमित व अखंड सेवा पूर्ण केलेल्या योग्य व्यक्तीची पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल; किंवा

(ब) आयोगाने घेतलेल्या स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांमधून, नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने, खालीलप्रमाणे निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांची नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्यात येईल :—

**(*i*) वयोमर्यादा :-**

(अ) किमान वयोमर्यादा : सदर पदाच्या भरतीसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उमेदवाराने अठरा वर्षे पूर्ण केलेली असावीत.

(ब) कमाल वयोमर्यादा : सदर पदाच्या भरतीसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार अर्ज सादर

करण्याच्या अंतिम दिनांकास, राखीव प्रवर्गातील व्यक्तींसाठी वय अडतीस वर्षे व राखीव प्रवर्गातील व्यक्तींसाठी वय त्रेचाळीस वर्षापेक्षा अधिक नसावे :

परंतु असे की, जे उमेदवार आधीपासून शासकीय सेवेत कार्यरत आहेत, अशा उमेदवारांसाठी वयोमर्यादेत पुढील पाच वर्षांची शिथिलता देण्यात येईल :

पुढे असेही की, जे मागासवर्गीय उमेदवार आधीपासून शासकीय सेवेत कार्यरत आहेत, त्यांना वयोमर्यादेतील शिथिलतेचा लाभ शासकीय सेवक म्हणून किंवा मागासवर्गीय उमेदवार म्हणून यापैकी कोणत्याही एका प्रकारे घेता येईल.

(ii) किमान शैक्षणिक अर्हता : उमेदवाराकडे भौतिकोपचार विषयातील किमान पदव्युत्तर पदवी (Post Graduate Degree) असणे आवश्यक आहे.

६. नियम ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने व नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करताना, भरण्यात येणाऱ्या एकूण मंजूर पदांच्या संख्येसाठी अनुक्रमे ५० : ५० या प्रमाणात नियुक्ती करण्यात येईल :

परंतु असे की, पदोन्नतीने नियुक्तीसाठी योग्य व्यक्ती उपलब्ध नसल्यास, त्या विशिष्ट नियुक्ती वर्षासाठी पदोन्नती व नामनिर्देशन यांचे प्रमाण, नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने शिथिल करता येईल.

७. नियम ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती दोन वर्षांच्या कालावधीसाठी परिविक्षाधीन (Probation) राहील. परिविक्षाधीन कालावधी जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत वाढविता येईल. परिविक्षाधीन कालावधी (वाढीव कालावधीसह) शासनाच्या परिविक्षा धोरणानुसार समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. सदर धोरणानुसार परिविक्षाधीन कालावधी (वाढीव कालावधीसह) समाधानकारकरित्या पूर्ण करण्यात अपयश आल्यास, त्याची सेवा समाप्त करण्यास पात्र राहील.

८ (१) नियम ३, ४ किंवा ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने, शासनाने वेळोवेळी यासंबंधी केलेल्या नियमांनुसार मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील, जोपर्यंत त्याने त्या पदावर पदोन्नती मिळण्यापूर्वीच सदर परीक्षा उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा देण्यापासून त्याला सूट दिलेली नसेल,

(२) नियम ४ किंवा ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने, शासनाने वेळोवेळी यासंबंधी केलेल्या नियमांनुसार नियुक्तीनंतर निर्धारित कालावधीत मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील, जोपर्यंत त्याने त्या परीक्षा पूर्वीच उत्तीर्ण केलेल्या नसतील. सदर परीक्षा उत्तीर्ण करेपर्यंत त्या व्यक्तीस वार्षिक वेतनवाढ (Annual Increment) किंवा पुढील पदोन्नतीच्या पदासाठी पात्रता मिळणार नाही.

९. (१) नियम ३, ४ किंवा ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीकडे, शासनाने वेळोवेळी या संदर्भात निर्गमित केलेल्या नियम किंवा आदेशांनुसार संगणक अर्हता प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील, जोपर्यंत त्या व्यक्तीकडे सदर प्रमाणपत्र आधीपासून उपलब्ध नसेल किंवा त्या प्रमाणपत्रापासून त्याला पदोन्नतीपूर्वी सूट दिलेली नसेल,

(२) नियम ४ किंवा ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीकडे, शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या नियमांनुसार नियुक्तीनंतर निर्धारित कालावधीत संगणक अर्हता प्रमाणपत्र प्राप्त करणे अथवा सूट दिलेली असणे आवश्यक राहील. अन्यथा, सदर प्रमाणपत्र प्राप्त करेपर्यंत अथवा सूट मिळेपर्यंत त्या व्यक्तीस वार्षिक वेतनवाढ किंवा पुढील पदोन्नतीच्या पदासाठी पात्रता मिळणार नाही.

१०. (१) नियम ४ किंवा ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ किंवा शासनाने वेळोवेळी या संदर्भात निर्गमित केलेले इतर नियम, आदेश किंवा संलेख यांच्या तरतुदीनुसार लहान कुटुंबाचे घोषणापत्र सादर करणे आवश्यक राहील.

(२) लहान कुटुंबाचे घोषणापत्र सादर करण्याच्या दिनांकास ज्या व्यक्तीस दोनपेक्षा अधिक अपत्ये असतील, ती व्यक्ती शासकीय सेवेत नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

(३) शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, नियुक्तीच्या वेळी किंवा त्यानंतर संबंधित व्यक्तीस दोनपेक्षा अधिक अपत्ये असल्याचे सिद्ध झाल्यास, ती व्यक्ती शासकीय सेवेत सदर पदावर कार्यरत राहण्यास अपात्र ठरेल.

११. नियम ३, ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हता व अनुभव, हे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने ( Maharashtra University of Health Sciences ) वेळोवेळी दिलेली मान्यता किंवा, यथास्थिति, रद्द केलेली मान्यता याच्या अधीन राहतील.

१२. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या कोणत्याही नियम किंवा शासन निर्णयांद्वारे निश्चित केलेल्या अटी व शर्ती, ज्या कोणत्याही शासकीय सेवकाच्या नियुक्तीपूर्वी किंवा नियुक्तीनंतर लागू करण्यात आलेल्या असतील, त्या नियम ३, ४ किंवा ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनाही लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्वेतांबरी खडे,**
शासनाच्या उप सचिव.

## MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT

Gokuldas Tejpal Hospital Compound, 9th Floor, L.T. Marg, New Mantralaya,
Mumbai 400 001, dated the 20th August, 2026.

*NOTIFICATION*

Constitution of India.

No. SEPRANI-3017/C.R.311/VAISEVA-3.— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all the existing rules, orders or instruments issued in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the post of Professor, Group A (Gazetted), Associate Professor, Group A (Gazetted) and Assistant Professor, Group B (Gazetted) in the Government Physiotherapy Institutes on the establishment of Directorate of Medical Education and Research, under the administrative control of the Medical Education and Drugs Department of the Government of Maharashtra, namely :—

1. These rules may be called "the Professor, Group A (Gazetted), Associate Professor, Group A (Gazetted) and Assistant Professor, Group B (Gazetted) in the Government Physiotherapy institutes on the establishment of Directorate of Medical Education and Research under the administrative control of the Medical Education and Drugs Department (Recruitment) Rules, 2026."

2. In these rules, unless the context requires otherwise,—

(*a*) "Appointing Authority" means,—

(i) the Chief Minister, State of Maharashtra in relation to the post of Group A ;

(ii) the Minister of the concerned Department in relation to the post of Group B ;

(*b*) "Commission" means the Maharashtra Public Service Commission ;

(*c*) "Directorate" means the Directorate of Medical Education and Research, under the administrative control of Medical Education and Drugs Department;

(*d*) "Government" means the Government of Maharashtra ;

(*e*) "eligibility for promotion" means eligibility for promotion in accordance with the terms and conditions specified for promotion by rules, Government Resolution or orders issued by the General Administration Department, from time to time ;

(*f*) "Postgraduate Degree" means the Postgraduate degree in Physiotherapy of a statutory University ;

(*g*) "recognized institution" means the Physiotherapy educational institute approved by the Maharashtra University of Health Sciences, Nasik.

3. Appointment to the post of Professor ( Group A ) shall be made by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority from amongst the persons holding the post of Associate Professor (Group A) in Government Physiotherapy Institutes on the establishment of Directorate having a regular and continuous service in the said post for not less than four years :

Provided that, if a person holding the post of Associate Professor possessing requisite experience is not available, then appointment to the post of Professor ( Group A ) shall be made by promotion of a person holding the post of Associate Professor ( Group A ) in Government Physiotherapy institutes, on the establishment of Directorate having not less than nine years of regular and continuous service, inclusive of combine service, as Associate Professor and Assistant Professor in such institute.

4. Appointment to the post of Associate Professor (Group A) shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person having eligibility for promotion, on the basis of seniority, from amongst the persons holding the post of Assistant Professor (Group B) in the Government Physiotherapy Institutes on the establishment of Directorate having a regular and continuous service in the said post for not less than five years ; or

(*b*) by nomination from amongst the candidates recommended by the Commission on the basis of result of competitive examination, with the approval of the Appointing Authority, who fulfills the following criteria, namely :-

**(i) Age Limit.—**

(*a*) Lower Age Limit.— Eighteen years of age completed on the last date of receipt of applications as per the advertisement for recruitment to the said post.

(*b*) Upper Age Limit.— Forty years of age completed for the persons not belonging to reserved categories and forty five years of age for the persons belonging to reserved categories as on the last date of receipt of applications as per advertisement for recruitment to the said post:

Provided that, the age limit for candidates who are already in Government service shall be relaxed for further five years:

Provided further that, the backward class candidates who are already working in the Government service can avail relaxation of age limit either for the Government service employees or for backward class employees.

**(ii) Minimum Educational Qualifications.—** A person holding a minimum Post Graduate Degree in Physiotherapy.

**(iii) Experience.—** A person holding a minimum experience of five years as Assistant Professor, Physiotherapy in the recognized institution.

The experience after possessing the minimum educational qualification cited in rule 4 (b) (ii) shall be taken into consideration while counting the period of experience.

5. Appointment to the post of Assistant Professor (Group B) shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority from amongst the persons holding the post of Physiotherapist (Group C) in Government Physiotherapy institutes on the establishment of Directorate having a regular and continuous service in the said post for not less than three years; or

(*b*) by nomination from amongst the candidates recommended by the Commission on the basis of the result of the competitive examination conducted by the Commission, with approval of the Appointing Authority, who fulfills the following criteria, namely :—

**(*i*) Age Limit.—**

(*a*) Lower Age Limit.— Eighteen years of age completed on the last date of receipt of applications as per the advertisement for recruitment to the said post.

(*b*) Upper Age Limit.— Thirty eight years of age completed for the persons not belonging to reserved categories and forty three years of age for the persons belonging to reserved categories as on the last date of receipt of applications as per advertisement for recruitment to the said post :

Provided that, the age limit for candidates who are already in Government service shall be relaxed for further five years :

Provided further that, the backward class candidates who are already working in the Government service can avail relaxation of age limit either for the Government service employees or for backward class employees.

(*ii*) Minimum Educational Qualifications.— A person holding a minimum Post Graduate Degree in Physiotherapy.

6. Appointment to the posts mentioned in rules 4 and 5 by promotion and nomination shall be made in the ratio of 50:50 respectively, for the total number of sanctioned posts to be filled :

Provided that, if a suitable person for appointment by promotion is not available, the ratio of

appointment by promotion and by nomination may be relaxed for that particular appointment year with the approval of the Appointing Authority.

7. A person appointed to the post mentioned in rules 4 and 5 by nomination shall be on probation for a period of two years. The probation period may be extended maximum up to one year. The probation period (including extended period) shall be completed satisfactorily as per the probation policy of the Government. In the event of failing to complete the probation period (including extended period) satisfactorily, as per the said policy, his services shall be liable to be terminated.

8. (1) A person appointed to the post mentioned in the rule 3, 4 or 5 by promotion shall pass the Marathi and Hindi Languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, unless he has already passed or had been exempted from passing those examinations before getting promoted to the said post.

(2) A person appointed to the post mentioned in rule 4 or 5 by nomination shall pass the Marathi and Hindi Languages examinations as per the rules made in that behalf by the Government. from time to time, within the prescribed time limit after appointment. unless he has already passed the said examinations. He shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he passed those examinations.

9. (1) A person appointed to the post mentioned in rule 3, 4 or 5 by promotion shall possess certificate of Computer Operations prescribed by rules or orders issued in that behalf by the Government, from time to time, unless he already possesses such certificate has been exempted there from, before getting promoted to the said post.

(2) A person appointed to the post mentioned in rule 4 or 5 by nomination shall possess a Certificate of Computers Operations prescribed by Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has been exempted from possessing such Certificate, otherwise he shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he possesses such certificate.

10. (1) A person recommended for appointment by nomination to the post mentioned in rules 4 or 5 shall submit a declaration of Small Family as per the provision of the Maharashtra Civil Services (Small Family Declaration) Rules, 2005 or any other rules, orders or any instruments issued in this behalf by the Government, from time to time.

(2) A person having more than two children on the date of submission of Declaration of small family shall be disqualified for the appointment in Government Service.

(3) After appointment of a person in the Government service, if it is proved that he has more than two children at the time of appointment or thereafter, then he shall be disqualified for continuing on the said post in the Government service.

11. The educational qualification and experience mentioned in rules 3, 4 and 5 shall be subject to the recognition or de-recognition, as the case may be, of such educational qualification and experience as specified by the Maharashtra University of Health Sciences, from time to time.

12. The terms and conditions specified by the Government, in any rules or resolutions issued by the Government from time to time, before or subsequent to the appointment of any Government servant shall also be applicable to the person appointed on the post mentioned in rule 3, 4 or 5.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHWETAMBARI KHADE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.